—:प्रेस नोट:—

# वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय कमलापुर उपक्षेत्र राजाराम (खां) येथील वनपालावर ॲन्टी करप्शन ब्युरो गडचिरोलीची कारवाई

गडचिरोली वनविभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, कमलापुर उपक्षेत्र राजाराम (खां) येथील क्षेत्र सहायक आलोसे श्री महेश जयंतराव धामनगे, वय ४७ वर्षे, (वर्ग–३) यांना १०,००० रुपयांची लाच रक्कम स्विकारतांना ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोलीच्या पथकाने रंगेहाथ पकडले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार हे तेलंगना राज्यातील रहीवासी असुन त्यांच्या काकांचे नावे असलेली ट्रक्टर ते स्वतां चालवीत असतात. तक्रारदार हे सध्या राजाराम (खां) येथे मोबदला घेवुन शेतकऱ्यांच्या शेतीच्या मशागतीचे काम करून देत असतांना दोन फॉरेस्ट गार्ड हे सदर ठिकानी येवुन तक्रारदार याला ' तुम वन जमीन पर अवैध रूपसे ट्रक्टरसे काम कर रहे हो, तुम्हारा ट्रक्टर ले जा रहे है' असे म्हणुन तक्रारदार याचे ताब्यातील ट्रक्टर घेवुन गेले व नंतर तक्रारदार यांचेसोबत आलोसे वनपाल श्री. महेश धामनगे यांनी संपर्क साधुन त्यांचेवर गुन्हा दाखल न करता कमी रकमेची दंडात्मक कारवाई करण्याचा मोबदला म्हणुन रूपये २५,०००/– लाच रक्कमेची मागणी केली. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील अधिकाऱ्यांना फोन करून तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची पोलीस उपअधिक्षक श्री. विक्रांत सगणे ला.प्र.वि. गडचिरोली यांनी दोन पंचासह नक्षलप्रभावीत क्षेत्रात जावुन अत्यंत गोपनीयरित्या शहानिशा करून पडताळणी करता आलोसे वनपाल श्री. महेश धामनगे यांनी तक्रारदाराकडे तडजोडी अंती १०,००० रूपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने सापळा कारवाईचे आयोजन केले असता, तक्रारदार यांचेवर गुन्हा दाखल न करता कमी रकमेची दंडात्मक कारवाई करण्याचा मोबदला म्हणुन आलोसे नामे महेश जयंतराव धामनगे हे दिनांक २१/०१/२०२६ रोजी १०,०००/– रुपये लाच रक्कम स्विकारतांना रंगेहाथ मिळून आल्याने त्यांचेविरूध्द उपपोस्टे, राजाराम (खां) येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आलोसे श्री महेश जयवंतराव धामनगे यांचे राजाराम खांदला व चंद्रपुर येथील निवासस्थानाची ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली व चंद्रपुर यांचे कडून घरझडती घेण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक डॉ. श्री. दिगंबर प्रधान, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर परीक्षेत्र, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपूर, मा. श्री. विजय माहुलकर अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र. वि. नागपुर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधिक्षक श्री. विक्रांत सगणे , पो.नि. किरण बगाटे, पोहवा किशोर जौंजारकर, पो.अं. संदीप उडान, प्रविन जुमनाके, नुतेश धुर्वे व चापोना राजेश्वर कुमरे, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली यांनी केलेली आहे.

गडचिरोली जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजंट) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली यांचेशी सपर्क साधावे असे आवाहन पोलीस उपधिक्षक श्री.विक्रांत सगणे यांनी केले आहे.

पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, गडचिरोली
मोबाईल/व्हॉटसॲप क्रमांक – ७५८८०४१०६४
दुरध्वनी क्रमांक – ०७१२–२९५०२० टोल फ्रि क्रमांक – १०६४

(संतोष पाटील)
पोलीस निरिक्षक,
ला.प्र.वि.गडचिरोली

Scanned with OKEN Scanner